# प्रेसनोट

दि. ३०/१२/२०२३

**पुणे महानगरपालिका, आरोग्यभवन येथील शिपायावार लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं. २६५/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ. |
| तक्रारदार / फिर्यादी | श्री. श्रीराम शिंदे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | ईर्शाद, पद - शिपाई, आरोग्यभवन, पुणे महानगरपालिका, पुणे. (वर्ग-४) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/- |
| पडताळणीमध्ये लाच मागणी रक्कम | २०,०००/- रुपये (वीस हजार रुपये) |

पडताळणी दिनांक :- २०/११/२०२३.

गुन्हा दाखल दिनांक :- ३०/१२/२०२३.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे पुणे महानगरपालिका हद्दीतील मृत जनावरे उचलण्याचा करार होता. सदर कराराची मुदत संपल्यानंतर तक्रारदार यांची पुणे महानगरपालिका येथे ठेव असलेली रक्कम परत दिल्याच्या मोबदल्यात लोकसेवक ईर्शाद यानी त्यांच्या वरिष्ठांसाठी तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक ईर्शाद यांनी तक्रारदार यांचेकडे पुणे महानगरपालिका येथे ठेव असलेली रक्कम परत दिल्याच्या मोबदल्यात तडजोडीअंती पंचासमक्ष २०,०००/- रुपये (वीस हजार रुपये) लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक रुपेश जाधव तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner